माझी लाडकी नातवंडं–

चि. जुई, आनंद, व मेघना यांस

सप्रेम

जिनी आजी

BVBK-0402904

# अनुक्रम


१ वादळातील सर्कस

२ लक्ष्मीची मूर्ती

३ भातुकली

४ चिमणी

५ रमाचा रेनकोट

६ एक आगळं मांजरीचं पिल्लू

७ विकास व शुभा प्रवासाला जातात.

८ सुनिल भैयाची दुर्बिण

२००४ १८।५।८४
BVBK-0402904

# वादळातील सर्कस

ग्रेट ग्रँड सर्कसचे मॅनेजर सरसेकर यांची सर्कस कलकत्यास गेली होती तेव्हाची गोष्ट. त्यांच्या सर्कशीत प्राण्यांची कामं फार सुरेख होत असत. मुलांना प्राणी प्रिय असल्याने सर्कस फार लोकप्रिय झाली. सर्कस येऊन तीन–चार महिने लोटले तरी सर्कसच्या प्रत्येक खेळाला खूपच गर्दी होत होती. सर्कसचे मॅनेजर त्यामुळे फार खूष होते. एक दिवस सकाळी त्यांनी नवीन शिवलेले चमकदार कपडे घातले, हातात चाबूक घेतला व थोडी तालीम करावी म्हणून स्वतःच्या तंबूच्या बाहेर आले. नवीन कपडयात कसं काय जमतंय ते त्यांना अजमावयाचं होतं. त्याच वेळी सर्कशीतल्या प्राण्यांचा आवडता बबलू, घोडयावर चतुराईने काम करणारी लैला हे पण आपापल्या तंबूतून बाहेर आले होते. सरसेकरांना नव्या पोषाखात पाहून बबलू लैलाजवळ जाऊन म्हणाला, 'लैला, आपले मॅनेजर नवे कपडे घालून सर्कसच्या रिंगमध्ये चाबूक फडकावीत, वाकडी टोपी घालून उभे राहतील तेव्हा किती मस्त दिसतील ग ? मी पण ठरवलंय्, एक दिवस त्यांच्यासारखं रिंगमास्टर व्हायचं.'

त्यावर लैला म्हणाली, 'तू खूप छान दिसशील हं !' ती त्याच्याकडे मान वाकडी करून पाहत होती. इतक्यात काय कोण जाणे, जोराचा वारा एकदम सुटला. लैलाचे केस भुरभुरू उडू लागले. बबलूचा 'डाकू' कुत्रा पळत पळत येऊन त्याच्या पायाजवळ लोळू लागला. 'काय बोचरा वारा !' बबलू म्हणाला.

'मीसुद्धा एकदम गारठले. हे थंडीचे दिवस खरे, पण असा एकदम वारा सुटणं, तोही असा चावरा; प्राण्यांना तर असा वारा मुळीच चालत नाही.' लैला आपला स्वेटर अंगाशी घट्ट ओढत म्हणाली.

'खरं आहे तुझं म्हणणं. काल रात्रीपासून वारा सुटलाय. पहाटे थोडा थांबला होता. आता परत सुरू झालाय. ही वादळाची चिन्हं आहेत !'

इतक्यात लैलाने हीरा घोडीचे खाखरणे ऐकले व म्हणाली, 'मला हीराकडे गेलं पाहिजे. ती घाबरलेली दिसतेय. आपले मॅनेजरपण आत गेलेले दिसतात.' एवढं बोलून लैला घोड्याच्या तबेल्याकडे पळाली. तेवढ्यात बबलूला जंबो हत्तीचे जोरजोराने कान फडकावणे ऐकू आले. तोपण आपल्या डाकू कुत्र्याला घेऊन जम्बोकडे गेला. तो दिवस कसाबसा पार पडला.

दुसरा दिवस उजाडला. त्या दिवशी जोराचं वादळ होणार असं सर्वांना वाटू लागलं. सरसेकरांना वाटलं, सर्कसचे खेळ बंद ठेवावेत, पण त्या दिवशी शहरात ठिकठिकाणी खेळ बंद असल्याच्या जाहिराती लावणं फार कठीण होतं. बरीचशी तिकिटंही खपली होती, खेळ करणं जरूर होतं.

त्या दिवशी वादळाची चिन्हं असूनसुद्धा काय कोण जाणे, सर्कशीला खूपच गर्दी लोटली. तंबू खच्चून भरला. बाहेर वारा जोराने वाहात होता. बॅन्डचा आवाजही मधून मधून वाऱ्याच्या आवाजात विरून जात होता. मॅनेजरना व इतर काम करणाऱ्यांना खेळ कसा पार पडतो याची चिंता वाटत होती. घोडे, कुत्री, माकडं, त्यांच्या शिक्षकांच्या कह्याबाहेर गेली होती.

शिपी माकड रिंगमध्ये जायची वेळ आली तसं कोपऱ्यात जाऊन बसलं. सगळे कपडे काढून टाकले. माकडाचा खेळ करणारा रझाक घाबरला. काय करावं ते त्याला सुचेना. बबलूच्या मदतीने मोठ्या प्रयासाने माकडाला पुन्हा सगळे कपडे घातले, पण तो इतका बेफाम झाला होता की त्याच्या पाळीला तो रिंगणात जाऊच शकला नाही. मग मॅनेजरच्या हुकुमाने विदूषकाने खेळ केला अन् शिपीला रिंगणात पाठवलं. एवढं करूनही त्यानं काम नीट केलंच नाही.

शिपीचं काम सायकलवरून तीन ते चार फेऱ्या मारण्याचं व मधून मधून टोपी उंचावून लोकांना लवून नमस्कार करायचं होतं. शिपी सारखा फेऱ्याच मारू लागला. रिंगणातून परतेना. त्याचा शिक्षक रिंगणात गेला तर त्याला शिपीने जोरात टपली मारली व खाली पाडलं. ते पाहून आणखी दोघे आत गेले व कसंबसं शिपीला रिंगणातून बाहेर काढला. तीच गत थोड्या फार फरकाने इतर प्राण्यांच्या खेळांची झाली.

प्राणी वादळाच्या घोंघावण्याने घाबरले होते. इतर खेळ मात्र छान झाले. त्यादिवशी वादळाची शक्यता लक्षात घेऊन सरसेकरांनी सर्कसचे खेळ अर्धा तास आधीच संपवले, अन् नेमकी त्याच वेळी वीज गेली. सर्वत्र अंधार पसरला. सर्कशीच्या लोकांनी कंदील पेटवून, विजेऱ्यांचे झोत टाकून लोकांना तंबूच्या बाहेर जायला मदत केली. जोराचा वारा वाहात होता. पाऊसही त्याचवेळी सुरू झाला. जम्बो हत्ती जोरजोराने ओरडू लागला. नशीब ! त्याला साखळदंडाने बांधले होते. त्यामुळे तो पळू शकला नाही. घोडे तबेल्यात खिकाळू लागले.

इतक्यात एक भयानक गोष्ट घडली ! सर्कसचा मोठा पांढरा तंबू एकदम कोसळला. सर्व लोक तंबूच्या बाहेर पडले

होते म्हणून बरं झालं. तंबू कोसळलेला पाहून सर्कशीतली काही अस्वलं मोकळी होती, ती घाबरली. मोठा पांढरा प्राणी आपल्यावर धावून येतोय असं त्यांना वाटलं असावं. दोन तीन अस्वलांना त्यांच्या दरवेशाने–भल्लाने पळत जाऊन पकडले पण दोन अस्वलं–चिमा व ढब्बू मात्र पळाली.

अस्वलं पळाल्याची ओरड झाली. सगळेजण त्या चिंतेत गर्क होते. तंबू पडला तिकडे कोणाचे लक्ष गेले नाही. सोमा सुताराने मात्र तंबू पडल्याचे पाहिल्याबरोबर खिळे ठोकून त्यात तंबूचे दोर अडकवून टाकले. त्यामुळे तो तंबू आणखी उडू शकला नाही. सगळेजण अस्वलांच्या शोधात होते. सरसेकर तर खूपच चिंतेत होते कारण त्यांना माहीत होतं की त्यांच्या अस्वलांना अशा परिस्थितीत गोळ्या घालून ठार मारण्यात येईल. खूप शोधाशोध केली पण अस्वलं सापडली नाहीत.

रात्र बरीच झाली होती. शेवटी सकाळी शोध घ्यायचा असं सर्वांनी ठरवलं. सर्वजण आपापल्या तंबूत गेले. बबलू खूप सैरभैर झाला होता. त्याला प्राणी फार प्रिय होते. सगळे गेले तरी तो मागे रेंगाळला. त्याच्या मनात एकदम काय आलं कोण जाणे, पण तो लैला जायला निघाली होती तिच्या मागे गेला व म्हणाला, 'मी चिमा व ढब्बूला शोधायला जाणार. तू येतेस ? मी डाकूला बरोबर घेईन. त्याची खूप मदत होईल शोध घेण्याच्या कामात.'

लैलाला असं काही धाडसाचं काम करायला नेहमीच आवडे. ती म्हणाली, 'मी माझ्या हीरा घोडीला एकदा पाहून येते. तू थांब.'

बबलू आपल्या डाकू कुत्र्याला घेऊन अस्वलांच्या पिंजऱ्यात गेला. त्याला म्हणाला, 'डाकू, वास घे त्या गवताचा, जमिनीचा. तुला आपले चिमा व ढब्बू शोधता आले पाहिजेत.'

डाकू बराच वेळ अस्वलांच्या पिंजऱ्यात हुंगत होता. इतक्यात लैला गरम कोट, स्कार्फ घेऊन आली. ती दोन मुलं अस्वलांच्या शोधार्थ निघाली. डाकू त्यांना नदीच्या बाजूला नेत होता. बबलूला वाटलं– डाकू इकडे कुठं नेतोय ? पण डाकू पुढे जातच होता. मुलं मागून जात होती. मुलांना वाटलं, विजेरी असती तर फार बरं झालं असतं ! मिट्ट काळोख होता. इतक्यात ढगांतून चंद्र बाहेर आला. मुलांना नदीकिनारी ढब्बू व चिमाच्या पायांचे ठसे उमटलेले दिसले. मुलं डाकूच्या मागे थोडी पुढे गेली, पण डाकू तेथून टेकडीकडे वळला. इतक्यात जोराची लाट आली. मुलांना वाटलं, नदीला पूर येणार. बबलू म्हणाला, 'आपण टेकडीजवळ आलो, पण नदीला पूर येत आहे. आपण परतणार कसे ?'

'बबलू, या नदीच्या पुराकडे पाहून आपण अस्वलांना विसरलो ! ती नदीत वाहून तर नसतील ना गेली ?' लैला म्हणाली.

'कोणास माहीत! आपणसुद्धा लवकर टेकडी चढून गेलो नाही तर वाहून जाऊ. तो पहा डाकू टेकडी चढू लागला.' असं बोलून बबलू लैलाचा हात धरून टेकडी चढू लागला. थोडं पुढे गेल्यावर त्यांना तिथे गुहा असावी असा भास झाला. काळोख तर मी म्हणत होता. मुलांना परत विजेरीची आठवण झाली. पण उपयोग काय ? लैला थंडीने कुडकुडत होती. ती म्हणाली, 'रात्रभर इथं थांबलो तर उद्या सर्कसमध्ये कामं करता येणार नाहीत. मग सरसेकर रागावतील.'

इतक्यात वारा कमी झाला. चंद्र क्षणभर ढगांतून बाहेर आला. मुलांना गुहा दिसली. ती आत शिरली. कुठं निजायला जमेल का म्हणून इकडे तिकडे पाहू लागली. तितक्यात त्यांना श्वासोच्छ्वासाचा आवाज आला. बबलूने लैलाला विचारले, ' हा आवाज नदीच्या पाण्याचा का वाऱ्याचा ?'



' बबलू, आवाज श्वासोच्छ्वासाचा आहे. तो या गुहेतूनच येतोय. डाकू कां भुंकत नाही कोण जाणे ! ' लैला म्हणाली. डाकूने ते ऐकलं व शेपटी हलवली. मग मात्र बबलू डाकूबरोबर जास्त आत गेला. लैला गुहेच्या तोंडाशी बसली. बबलूला पुढे गेल्यावर काही मऊ केसाळ, गरम-गरम लागलं ! त्याने लैलाला हाक मारली. तिला म्हणाला, ' लैला, आपली अस्वलं इथंच आहेत. त्यांच्याच श्वासोच्छ्वासाचा तो आवाज होता. ' हे ऐकून लैला थरारली. ती आत गेली. त्या दोन्ही मुलांनी अस्वलांना कुरवाळलं. अस्वलं जागी झाली. ती मुलं त्यांच्या ओळखीचीच होती.

अस्वलं डाकूशी खेळू लागली. ‘ किती सुदैवी आपण ! आपली अस्वलं मिळालीत ! ’ असं म्हणून लैला अस्वलांच्या पाठीवर रेलली. तिला ते मऊमऊ गरम शरीर बरं वाटलं.

‘ आपण या दोन अस्वलांना चिकटून निजू. म्हणजे थंडी जाईल. ’ बबलू म्हणाला. थोड्याच वेळात अस्वलं, डाकू व दोन्ही मुलं झोपी गेली. चांगलं उजाडलं तेव्हा मुलांना जाग आली. लैला म्हणाली, ‘ बबलू, आता परतायला हवं. नदीचा पूर बराच ओसरलाय. सर्कशीत आपली शोधाशोध सुरू असेल. ’

बबलू उठला व बाहेर जाऊन पाहू लागला तर त्याला नदीत होडी दिसली. लैलाला तो म्हणाला, ‘ आपल्याला नदी-पलीकडे जायचंय. अजून नदीला बरंच पाणी आहे. मला तिथं होडी दिसतेय. ती थांबवू व त्यातून जाऊ. ’

त्या दोन मुलांनी मोठ्या मिनतवारीनं त्या दोन अस्व-लांना गुहेतून बाहेर काढलं. बाहेर आल्यावर मात्र सर्वजण पटकन नदीकाठी गेले. बबलूने होडीवाल्याला विचारले, ‘ आम्हाला होडीतून नदीच्या पलीकडील तीरावर सोडाल का ? आम्ही तुमचं भाडं देऊ. ’

होडीवाल्यांनी अस्वलं पाहिली व डोळे फाडफाडून ते एकमेकांकडे पाहू लागले. खुणेनं एकानं दुसऱ्याला विचारलं, ‘ आपण स्वप्नात तर नाही नं ? ’ दोघे होडीवाले काही बोलेनात. मुलांनी परत विचारलं, ‘ घ्याल का होडीत आम्हाला ? ’

आता होडीवाल्यांना वाचा फुटली. ‘ ही अस्वलं इथं कशी? पळून आलीत काय ? ’

‘ होय. ती काल रात्री इकडे पळून आलीत. रात्री

आम्हाला इथं सापडलीत. रात्री वादळ होतं त्यामुळे इथं अड-कलो.' लैला म्हणाली.

'तुम्हाला नेऊ. अस्वलांना होडीत घेणार नाही. ती आम्हांला फाडून खातील."

'नाही, नाही. असं होणार नाही.' बबलू म्हणाला. अस्वलांना कोणी घाबरत असेल हे त्याला खरंच वाटेना. लैलाने अजीजीने म्हटलं, 'अस्वलांना घ्या. त्यांना आम्ही सांभाळू. त्यांना इथं ठेवलं तर ती पुन्हा पळून जातील.'

होडीवाले विचारात पडले. दुसरेही काही प्रवासी होतेच. मग होडीवाले म्हणाले, 'तुम्ही त्या अस्वलांना धरून एका बाजूला बसा. ती आमच्याकडे आली तर याद राखा. आम्ही त्यांना नदीत ढकलून देऊ.'

दोन्ही मुलांनी अस्वलं त्रास देणार नाहीत असं परत परत होडीवाल्यांना आश्वासन दिलं. होडीवाले कसेबसे त्या अस्वलांना होडीत घ्यायला तयार झाले. अस्वलांना होडीत बसवणं हे एक दिव्यच होतं. होडीवाले अगर इतर कोणी मदतीला येईनात. खूप खटपटीनंतर डाकू कुत्र्याच्या मदतीने त्या मुलांनी अस्वलांना होडीत चढवलं. दोन अस्वलं, डाकू व दोन मुलं एका बाजूला बसली. बाकी सर्वजण दुसऱ्या बाजूला. तरी पण होडी एक बाजूने जड झाली. होडी हलेना. इतक्यात चिमाने खेळकरपणाने आपला पंजा होडीवाल्यावर उगारला. होडीवाला चिडला व घाबरला.

ते पाहून बबलूने चिमाला चापट मारली व म्हणाला, 'मूर्खासारखं वागू नकोस.' लैलाने दोघांना आवरून धरलं. बबलू व डाकू मध्यभागी गेले. बबलूने होडीवाल्यांना वल्हवायला

मदत केली. होडी सुरू झाली. होडीतल्या माणसांपैकी एकाने विचारलं, ‘अस्वलांना होडीत कां घेतलं!’ त्यावर कोणीच काही बोललं नाही. वल्हवता वल्हवता बबलू हसला. तो आता परतण्याच्या आनंदात होता. त्याने लैलाला विचारलं, ‘आपण चिमा व ढब्बूला शोधायला गेलोय असं कोणाला तरी वाटेल का?’ यावर लैलाने नुसती मान हलवली. ती अस्वलांना शांत ठेवण्यात व सांभाळण्यात गुंतली होती. होडीच्या डोलण्यामुळे अस्वलं अस्वस्थ होती. प्रवास लांबचा नव्हता हे सुदैव!

लौकरच होडी काठाला लागली. सर्व माणसं पटापट उतरली व लांब जाऊन थांबली. मुलं अस्वलांना उतरवण्याचा प्रयत्न करीत होती. पण ती उतरेनात. होडीवाले चिडले. लैलाने अस्वलं बबलूच्या ताब्यात दिली. ती अस्वलांचा दरवेशी भल्ला याला बोलवायला गेली डाकू व बबलू अस्वलाजवळ बसून होते. होडीवाले अस्वलांना लौकर बाहेर काढा असं ओरडून सांगत होते. बबलू अस्वलांना सांभाळता सांभाळता घामाघूम झाला.

लैला सर्कशीच्या तंबूत गेली तो काय आश्चर्य! सगळी-जण बाहेरच उभी होती. तिला सरसेकरांचा आवाज ऐकू आला ‘अस्वलं गेली, मुलं गेली, तंबू पडला.’ इतक्यात भल्लाने लैलाला पाहिलं. तो ओरडला, ‘लैला, तू कुठं होतीस?’ हे ऐकून सगळेजण सावध झाले. सगळेजण लैलाभोवती जमले. तिच्या आईने तिला मिठी मारली व म्हणाली, ‘मला वाटलं तुला व बबलूला वादळानं उडवून नेलं.’ आईच्या डोळ्यांत अश्रू आले.

‘आई, रडू नकोस. मी छान आहे. बबलू पण खुशाल आहे. आपली अस्वलं सापडली.’

'काय ? अस्वलं सापडली ?' भल्लाने आनंदाने विचारले. लैलाने सर्व हकीकत अगदी थोडक्यात व झटपट सांगितली. मग म्हणाली, 'भल्लाकाका, अस्वलं होडीतून बाहेर येत नाहीत. तुम्ही चला त्यांना बाहेर काढायला. येता का ?'

आनंदाने उडी मारून भल्ला म्हणाला, 'चल लवकर'. लैला व भल्ला गेले. भल्लाला पाहून अस्वलं पटकन् होडी-बाहेर आली. बबलू म्हणाला, 'आश्चर्यच आहे. भल्लाकाका, मी घामाघूम झालो त्यांना बाहेर काढता काढता पण ती बाहेर येईनात.' मग भल्ला, अस्वलं, डाकू, बबलू व लैला सर्वजण सर्कशीत परतले. परतण्यापूर्वी भल्लाकाकाने होडीवाल्यांचे आभार मानले. त्यांना भरपूर मोबदला दिला. अस्वलं परतलेली पाहून इतका वेळ चिंताक्रांत असलेले सरसेकर आनंदी झाले.

'माझे शूर सैनिक– लैला, बबलू व डाकू' असं म्हणून त्यांनी सर्वांना मायेने कुरवाळलं.

# लक्ष्मीची मूर्ती

श्रीनगरामध्ये एक नवीन देऊळ बांधायचं ठरलं. त्यानुसार काम पण सुरू झालं. तेथील नागरिकांनी देवळात लक्ष्मीची मूर्ती स्थापन करण्याचं ठरवलं. त्यासाठी पाचजणांची एक समिती नेमली. त्या समितीकडे मूर्ती कोणाला घडवायला द्यायची, किती उंचीची ती असावी, किती खर्च करायचा वगैरे नक्की करण्याचं काम सोपवलं गेलं. त्या समितीचे प्रमुख होते राजेंद्रसिंहजी. ते मंदिराच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्षही होते. रामू पाथरवटाला ते चांगले ओळखत होते. रामू त्यांच्या बारामुला गावचाच होता. छोटचा गावात बहुतेक लोक एकमेकांना ओळखतातच. त्यातून रामू त्या गावात हुशार पाथरवट म्हणून ओळखला जात होता. राजेंद्रसिंहजींनी समितीला मूर्ती घडविण्याचं काम रामूला द्यावं असं सुचवलं. रामूने घडविलेल्या मूर्ती कुठल्या कुठल्या मंदिरात स्थापन केल्या गेल्यात तेसुद्धा सांगितलं. समितीच्या सदस्यांनी रामूकडं जाऊन त्याचं काम पाहिलं व त्याच्याकडे लक्ष्मीची मूर्ती घडवण्याचं काम सोपवलं.

रामू, रामूची पत्नी सीता व मुलगा केशव हे एक सुखी कुटुंब होतं. रामूला काही फार मोठी प्राप्ती धंद्यात होत होती असं नव्हतं. होणाऱ्या प्राप्तीत त्याचं जेमतेम भागे. चैन, मजा करता येत नसे. रामूचा मुलगा शाळेत नववीच्या वर्गात शिकत होता. तोसुद्धा रामूला मूर्ती घडवण्याच्या कामात मदत करी. रामूत लहानपणापासून मूर्ती घडवण्याची प्रतिभा, कला, उर्मी होती ती मात्र केशवमध्ये दिसून येत नव्हती. रामूला वाटे, केशव तसा लहान आहे. हळूहळू जमेल त्याला.

रामूच्या शेजारी एक मुसलमान कुटुंब रहात होतं. दोन्ही कुटुंबांत फार एकी होती, मैत्री होती. मुसलमान कुटुंबाचा प्रमुख होता महंमद व त्याच्या पत्नीचं नाव होतं अमीनाबी. त्यांनाही एक मुलगा होता. त्याचं नाव होतं रहीम. रहीम केशवच्याच वर्गात शिकत होता. केशव व रहीम मित्र होते. रहीम केशवच्या वडिलांना 'रामूचाचा' म्हणायचा. रामू मूर्ती घडवत असला की रहीम तेथे बसून त्याचं काम न्याहाळत असे. महंमद आपल्या ओळखीने रामूला कामे आणून देई. महंमदचा धंदा होता वीणकराचा. त्यामुळे ते काम घरीच सुरू केलं होतं.

एक दिवस रामूची पत्नी सीता खूपच आजारी झाली. अमीनाबी तिची सारखी सेवा, शुश्रूषा करत होती. सीताचा ताप, खोकला वाढला. घरगुती औषधांचा उपयोग होईना. रामूजवळ डॉक्टर बोलवण्याइतके पैसे नव्हते. रहीमने कष्टाने जमविलेले २२ रुपये त्याला दिले. डॉक्टरांना घेऊन केशव आला. डॉक्टरने औषधं लिहून दिली व आपली फी २० रु. घेऊन निघून गेले. रामूपुढे परत प्रश्न ! रामूने मोठ्या कष्टाने त्याला लग्नात सीताच्या वडिलांकडून मिळालेली सोन्याची अंगठी केशवला दिली व ती विकून औषध आणण्यास पाठवलं. केशव औषध घेऊन यायच्या आतच सीताने सर्वांचा शेवटचा निरोप घेतला. केशवला खूप दुःख झालं, पण करणार काय ?

रहीम व केशव शाळांत परीक्षेला बसले होते. केशवची आई गेली अन् एक दोन दिवसांतच परीक्षेचा निकाल कळला. केशव-रहीम दोघेही चांगल्याप्रकारे पास झाले होते. केशवला पास झाल्याचा आनंद वाटेना. पैशाच्या अभावी आपण आई गमावली हे दुःख त्याला फार जाणवलं. तो रामूला म्हणाला,

'बाबा, तुम्ही इतकी मेहनत करता पण काय उपयोग ? मेहनतीच्या मानाने पैसे मिळत नाहीत. तुमची ढोर मेहनत व प्राप्ती शून्य. तुमच्या म्हणण्याप्रमाणे मी तुमचा धंदा करणार नाही. किती दिवस आपण गरिबीत काढायचे ?'


'केशव, आपला हा वंशपरंपरागत धंदा आहे. मी हा धंदा सोडणार नाही. मी ही कला जतन करणार. अरे, मला बरकत नाही आली, माझं नशीब ! पण मला खात्री आहे, तू पैसे कमावशील.'

'बाबा, उगीच खोटी आशा दाखवू नका. मी या गावातून बाहेर पडणार. शहरात जाऊन पैसे कमवीन. मला आता पाथरवट व्हायचं नाही !'

त्यानंतर केशवच्या वडिलांनी त्याला खूप समजावलं पण त्याने ऐकलं नाही. केशव गाव सोडून गेला. रामू एकटा पडला. तो आता दिवसाचे पंधरा-वीस तास काम करू लागला. जेवणाखाण्याची त्याला शुद्ध नसे. महंमदचा मुलगा रहीम मात्र वडिलांजवळ राहिला व धंदा शिकू लागला. रहीम वेळ मिळेल तेव्हा रामूचाचाकडे जाई. त्याला हवं नको ते पाही व कामात थोडी फार मदत पण करी. केशवच्या व रामूचाचाच्या सहवासात त्याला मूर्ती घडवण्याच्या कामातलं खूप काही शिकायला मिळालं होतं. खरं तर त्याला त्यात रस उत्पन्न झाला होता. पुष्कळदा गुपचूप रामूचाच्याची हत्यारं घेऊन तो काहीबाही काम करी.

रामूचाच्याला मूर्ती लवकर तयार करायला हवी होती. मूर्ती बसविण्याचा दिवस ८-१०. दिवसांवर आला. रामू

दिवसाचे १५–१६ तास काम करीत होता. जेवण्याखाण्याचे त्याला भान नसे. रहीम आठवणीने खानावळीतून त्याला डबा आणून जेवायला लावी. रामूने जेवता जेवता रहीमला विचारलं, 'रहीम बेटा, आठ दिवसांत ही मूर्ती तयार होईन नं ?'



'मूर्ती तयार होईल चाचा. तुम्ही मुळीच काळजी करू नका !'

रामू जेवला व परत काम सुरू केले. अशा तऱ्हेने सहा दिवस गेले. मूर्तीचे डोळे कोरायचे राहिले होते. ते काम नाजूक व वेळ घेणारे होते. रामू स्वतःशीच म्हणाला, 'केशव असता तर त्याने काही मदत केली असती. तसा तो मूर्ती कोरत होता, पण त्याला पुष्कळच जमायला हवं होतं. ते अजूनच यायला हवं ...' इतक्यात रहीम आला त्याने चाचाचे थोडे बोलणे ऐकले व म्हणाला, 'कोणाशी बोलत होता चाचा !'

'अरे, वाटलं, केशव असता तर !'

'चाचा, आता थोडंच काम राहिलंय. आता होईल पुरं. काळजी करू नका. चाचा, जेवलात नं ?'

'हो. जेवलो. आता आज रात्रभर काम करीन म्हणतो.'

'चाचा, जास्त जागू नका. उद्या सकाळी होईल काम पुरं. ते लोक तर मूर्ती घ्यायला संध्याकाळी येणार आहेत.'

रामूचाचा हसला व म्हणाला, 'खरंय तुझं म्हणणं. तू मला उत्साह देतोस, म्हणून माझं काम होतं.'

इतक्यात रहीमच्या आईची हाक आली म्हणून तो गेला. रामू रात्री अकरापर्यंत काम करीत होता. नंतर त्याला थकव्यामुळे झोप लागली. रामूच्या खोलीत दिवा जळत होता, पण खोलीतून आवाज येत नव्हता. म्हणून महंमद रहीमला म्हणाला, 'रहीम, पाहून ये चाचा काय करतोय ते.' रहीम रामूच्या खोलीत गेला तो चाचाला झोप लागली होती.

रहीमने हातात छिन्नी घेतली व तो लक्ष्मीचे डोळे कोरू लागला. काही वेळाने छिन्नीच्या आवाजाने रामू जागा होतो. त्याला वाटले आपला केशव परत आला असावा. तो डोळे उघडून मूर्तीकडे पहातो तो रहीम एकाग्रतेने लक्ष्मीचे डोळे कोरत होता. रहीमने छानच डोळे केलेले होते. रामू धडपडत उठून रहीमकडे जाणार तोच रहीमचं लक्ष चाचाकडे जातं. तो ओशाळतो व म्हणतो, 'मी तुमचे काम पाहून शिकलो व चोरून थोडं थोडं काम करीत होतो.'

'रहीम, तू मोठा कलाकार होणार.' असं म्हणून रामूने त्याला मिठी मारली.

'मला माहीत आहे मी तुमची परवानगी न घेता घडवायला नको होतं. पण चाचा, तुमचा थकवा मला पहावेना. तुम्हाला मदत केल्याशिवाय रहावेना.' एवढं रहीम बोलला अन् त्याच्या डोळ्यांतून अश्रू झरू लागले.

'रहीम, मूर्ती घडविण्यात कसलाही भेदभाव नसतो. बेटा, रडू नकोस. हा तर फार मोठा आनंदाचा क्षण आहे.' रामूचाचा एवढं बोलून अमीनाबी व महंमदला हाका मारू लागला. त्याच्या हाका ऐकून दोघेही धावत रामूकडे गेले. त्यांना पाहून रामू म्हणाला, 'आपला रहीम मोठा कलाकार होणार. आपण उद्या गोडधोड करून दिवस साजरा करू या हं.'

महंमद व अमीनाबी आश्चर्याने पाहू लागले.

# भातुकली

विमलकाकी व गौतमकाका मुलुंडल[illegible]ठच्या फ्लॅट-मध्ये राहत होते. त्या इमारतीत चोवीस बिऱ्हाडं होती. सर्वजण खेळीमेळीने आनंदात राहात होते. विमलकाकी व गौतमकाकाला स्वतःची मुलं नव्हती, पण इमारतीतील सगळी मुलं त्यांचीच मुलं झाली होती. मुलांना काका-काकी फार प्रिय. मुलं घरात जमली की विमलकाकीने त्यांना छान छान गोष्टी सांगाव्या, त्यांच्याशी खेळ खेळावे. गौतमकाकाने तर मुलांसाठी घरात निरनिराळे खेळही आणून ठेवले होते. दोघांनाही मुलांचा त्रास वाटत नसे. घरात पसारा, केर झाला तरी ती दोघे कधी रागा-वत नसत. मात्र खेळ संपल्यावर मुलांना खेळणी जागेवर ठेवून घर स्वच्छ करायला ती त्यांना मदतही करीत असत. विमलकाकी सुग्रण होती. ती मधूनमधून मुलांसाठी सामोसे, नरम नरम केक करी. मुलं त्या पदार्थांचा आनंदाने आस्वाद घेत. मुलं तिला पदार्थ करण्यात मदतही करत.

गौतमकाका एका शाळेत विज्ञान शिक्षक होते. ते हसत खेळत नवीन शोधांबद्दल मोठ्या मुलांना माहिती देत. लहान मुलांना नकळत विज्ञान शिकवीत. अशा तऱ्हेने मुलांत विज्ञानाची आवड निर्माण करीत.

दिवाळीची सुट्टी लागली होती. विमलकाकीकडे मुलं जमली होती. आनंदाने गप्पागोष्टी चालल्या होत्या. दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या विजयने विचारलं, 'काकी तू लहानपणी कोणते खेळ खेळत होतीस ?' विभाने विचारलं 'तुला खूप मैत्रिणी होत्या का ?'

विमलकाकी हसली व म्हणाली, ' लहानपणी आम्ही १५-२० जणीं एकत्र जमून सूरपारंब्या, लपाछपी, बाहुलीचे लग्न, भातुकली वगैरे खेळ खेळत असू. दिवाळीत किल्ले बनवत होतो. '

' भातुकली म्हणजे ग काय ? ' छोट्या पिंटूने विचारलं.

' तुम्ही आजकाल पार्टी करता ना ! तसंच थोडं ! पण आम्ही घरून कणिक, तांदूळ, मीठ, तेल वगैरे आणून कोणाकडे तरी पदार्थ बनवून एकत्र बसून खातपीत असू. खूप मजा येई करण्याची व खाण्याची. '

' आपण करू या नं मग भातुकली. तू आम्हाला मार्ग-दर्शन कर. ' लीला म्हणाली.

' खरंच खूप मजा येईल. आपण आपल्या आईबाबांना बोलावू जेवायला. चकित करू त्यांना. ' राकेश म्हणाला.

सगळ्या मुलांना भातुकलीची कल्पना खूप आवडली. ' काकी, तू मार्गदर्शन कर. आम्ही सर्व कामं करू. कोणते पदार्थ करायचे आपण ? ' लीलाने विचारलं.

मग सगळ्यांच्या मते बटाटेवडे, पुऱ्या, बटाट्याची भाजी सँडविचेस, लिंबाचं सरबत करायचं ठरलं. विमलकाकी म्हणाली. ' बटाटेवडे व बटाट्याची भाजी दोन्ही एकच ! त्यापेक्षा आपण सामोसे करू या. बटाटेवडे नको. ' सर्वांना कल्पना आवडली. विमलकाकी म्हणाली, ' दिवाळी आहे तर मी श्रीखंड करीन. माझे स्वयंपाकघर वापरा. तिखटमीठ, तेल मी देईन. ' गच्चीत खाणपिणं करायचं ठरलं,

काय काय वस्तू लागतील याची मुलांनी विमलकाकीच्या मदतीने यादी केली. सुशोभनासाठी काय लागेल. याची

पण यादी केली. मग असं ठरलं की, प्रत्येकानं दोन वाट्या कणिक, एक लिंबू, दोन बटाटे, एक टोमॅटो व अर्धी वाटी साखर घरून आणायची. बाकी वस्तू मुलांचे खाऊचे पैसे एकत्र करून त्यातून आणायच्या. भातुकली दिवाळीच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी होणार होती. दिवाळीची सुरुवात व्हायला केवळ तीन दिवस होते. बेत ठरला व दुसऱ्या दिवशी पिंटू, लीला, मंजिरी, विमलकाकीकडे जमले. ही मुलं आमंत्रणपत्रिका तयार करू लागली. सर्व मुलं चित्रकलेत निपुण होती. त्यांचं हस्ताक्षर छान होतं. आईबाबांना आमंत्रण देण्यासाठी काय मजकूर लिहायचा ते नक्की झालं. मग भराभरा आमंत्रणपत्रिका तयार होऊ लागल्या. उमेश व राकेश त्या दिवशी कोणते खेळ खेळायचे ते ठरवू लागले. त्यासाठी काय तयारी करायची ते नक्की झाले. संध्याकाळपर्यंत आमंत्रणपत्रिका तयार झाल्या व चार मुलांचा दुसरा एक कंपू त्या पत्रिका वाटायला गेला.

भातुकलीच्या आदल्या दिवशी चार–पाच मुलांनी सुशोभनासाठी पताका तयार केल्या, फुले आणून ठेवली. खेळासाठी बक्षिसे व योग्य ती तयारी करून ठेवली. एका मुलाने फळचावर छानसं गाढवाचं चित्र काढलं. मात्र त्याला शेपटी काढली नाही. गाढवाला शेपटी लावण्याच्या खेळासाठी ही तयारी होती !

काही मुलं भातुकलीसाठी ब्रेड, डाळीचं पीठ, वगैरे सामान आणायला गेली. अशा तऱ्हेने प्रत्येकाला काम मिळालं व प्रत्येक-जण ते उत्साहाने करीत होता.

भातुकलीचा दिवस उजाडला. सर्वजण आंघोळी, सकाळचा फराळ आटोपून विमलकाकीकडे जमले. काहीजण गच्चीत सुशो-

भन करायला गेले. गौतमकाका त्यांना मार्गदर्शन करीत होते. विभा, उमा, विकास, चिकू, उमेश वगैरे मुलांकडे हे काम दिलं होतं. मुली पदार्थ बनविण्याची तयारी करू लागल्या. कामात दुपारचे बारा केव्हा वाजले हे समजलेच नाही. मग सगळेजण घरी जेवायला गेले. विमलकाकींनी त्यांना दुपारी तीनला या म्हणून सांगितले.

बरोबर तीनच्या ठोक्याला सर्वजण हजर झाली. अनिता, उमा, सुभा वगैरे सामोसे करायला बसल्या. विभाने पुऱ्यांसाठी कणिक भिजवायला घेतली. ते पाहून विमलकाकीने विचारलं,

'पुऱ्यांची कणिक कशी भिजवायची विभा ?'

'त्यात काय मोठं ?' पोळ्यांसाठी भिजवतो तशी.'

विमलकाकी हसून म्हणाली, 'पोळ्यांसाठी आपण थोडी सैलसर भिजवतो कणिक. पुऱ्यांसाठी घट्ट भिजवावी व मोहनही जास्त घालावं म्हणजे पुऱ्या खुसखुशीत होतात.'

'बरं झालं सांगितलंत. आई घरी पुऱ्या करते तेव्हा माझं लक्षच नसतं. पण मोहन म्हणजे काय ?'

'कणिक भिजवायच्या आधी त्यात आपण तेल नाही का घालत ? त्यालाच मोहन म्हणतात.'

कोणीतरी बटाटे उकडत घातले. त्यावर झाकण ठेवायची तिला आठवणच नव्हती. ते पाहून विमलकाकी म्हणाली, 'उमा, त्यावर झाकण ठेव म्हणजे लौकर उकडले जातील बटाटे. वाफेची उष्णता बाहेर जाता कामा नाही. ती बाहेर गेली की उकडायला वेळ लागेल व इंधन जास्त जळेल.'

'खरं का ? बरं झालं सांगितलंत ते. वाफेत खूप उष्णता असते हे माहीतच नव्हतं.

अशा तऱ्हेने नवीन शिकत मजेत कामं चालू होती. मुलांनी आपल्या आवडत्या गाण्यांच्या रेकॉर्ड लावण्याचा सपाटा चालवला होता. काम करता करता गाणी ऐकत होती मुलं.

मुलींना मिक्सरमध्ये चटणी करायची होती. रेकॉर्डप्लेअर थांबवायला कोणी तयार होईना. विजेचं बटन एकच होतं. महेश पळतच घरी गेला व तीन प्लगचं सॉकेट घेऊन आला. आता गाणं ऐकताऐकता मिक्सरमध्ये चटणी करणं शक्य होतं. मिक्सर मुलं सुरू करणार तोच काही कामासाठी गौतमकाका तिथे आला. त्याने ते पाहिलं व म्हणाला, ' थांबा. मिक्सर सुरू करू नका. '

' कां बरं काका ?'

' विजेची दोन साधनं एकाच बटणावर चालवणं म्हणजे दोन्हीसाठी विजेचा प्रवाह वापरणं. जितका जास्त प्रवाह तितकी उष्णता जास्त. त्यामुळे विजेच्या तारेचं वेष्टन जळतंसुद्धा. मग आग लागते. म्हणूनच एकावेळी एकच साधन एका बटनावर चालवावं. ' मग मुलांनी रेकॉर्डप्लेअर बंद केला. मिक्सर चालू केला.

सुमानं पुऱ्या लाटल्या. कढईत तूप खूपच तापलं होतं. तिनं थोड्या उंचावरूनच पुरी तुपात टाकली. तूप उडालं व तिचा हात भाजला. ती एकदम ओरडली. विमलकाकीने पटकन् पातेल्यात थंड पाणी घेऊन तिचा हात त्यात बुडवला. आग थांबली. थोडासा लाल ठिपका हातावर राहिला. राजूने विचारलं, ' काकी, हात पाण्यात कां बुडवलात ? मलम कां नाही लावलंत ?'

'भाजलेली जागा थंड पाण्याने थंड होते. उष्णतेने चामडी खराब होते. पाण्यामुळे उष्णता कमी होते व जखम मर्यादित राहते.' काकानं खुलासा केला.

रोहिणी व उषा सामोसे करायला बसल्या. रोहिणीने गॅस पेटवायला काडी ओढली पण गॅस पेटेना. ते पाहून विमल-काकीने विचारलं, 'तू गॅसचा व्हॉल्व्ह फिरवलास का ?'

'तो फिरवावा लागतो ? माझी आई तर तसं काही करत नाही !'

'हे पहा रोहिणी, व्हॉल्व्ह बंद केला नाही तर रबरी नळीत गॅस राहातो. मग हा गॅस तेथून गळू शकतो. बर्नरचं बटन सुरू केलं तर त्यातूनही गळतो. म्हणून सिलिंडरचा व्हॉल्व्ह प्रथम बंद केला पाहिजे. नंतर बर्नरचं बटन. आपलं स्वयंपाकाचं काम संपलं की ही काळजी घेणं जरूर आहे.'



मुलींनी कढईत तेल घालून ती गॅसवर ठेवली. तेल खूप तापलं. फ्रिजमध्ये ठेवलेले सामोसे घ्यायला मुली गेल्या. सामोसे घेऊन त्या परतल्या तो तेलाने पेट घेतला. रोहिणीने प्रसंगावधान ठेवून गॅस बंद केला व कढईवर झाकण ठेवलं. जाळ विझला. काय गोंधळ झाला म्हणून विमलकाकी आली. तिनं रोहिणीचं खूप कौतुक केलं. रोहिणी म्हणाली, 'मला आईनं शिकवलं.' कढई थंड होईपर्यंत झाकण काढू नका म्हणून विमलकाकीने मुलींना बजावलं.

संध्याकाळपर्यंत सर्व पदार्थ तयार झाले. मुलं व मुली छान कपडे करून तयार झाल्या. मुलांचे आईवडील ठरलेल्या वेळी आले. प्रथम सगळेजण खेळ खेळले, मग खाणं पिणं झालं. सर्व पदार्थ छान झाले होते. मुलांच्या आईवडिलांनी त्याबद्दल प्रशंसापत्र दिलं.

मुलांचे आईवडील मुलांसह आनंदात घरी गेले. जाताना त्यांनी विमलकाकी व गौतमकाकाचे खूप आभार मानले.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. २९०७४ दिनांक १५/२/०४
विषय बा.वा. क्र. ..........

# चिमणी

त्या दिवशी चैतन्यचा वाढदिवस होता. वाढदिवसानिमित्त बागेत पार्टी ठेवली होती. पार्टीची वेळ संध्याकाळी पाच ते सहाच्या दरम्यान होती. सगळी मुलं आली. फराळाचे भरून बशा आणून ठेवल्या. इतक्यात पार्टीत भाग घ्यायला एक चिमणी आली. ती सामोशावर चोच मारणार इतक्यात चैतन्यच्या आईनं तिला रुमाल हलवून घालवून दिलं. अरेरे ! बिचारी चिमणी ! ती पार्टीत भाग न घेताच निघून गेली. पण जरासुद्धा रागावली नाही. थोड्या वेळाने चिवचिवत परत फिरली. आदित्यने तिला सामोशातले वाटाणे दिले खायला. तिने आनंदाने एक वाटाणा उचलला व भुर्रकन् आली तशी गेली. किती आनंदी पक्षी. चिमणी जशी आनंदी तशीच बुद्धिमान पण आहे हं !


चिमणीच्या सोबतीत माणूस एकटेपणा विसरतो. त्यांचा चिवचिवाट ऐकण्यात माणसाला एक प्रकारचा आनंद मिळतो व माणूस एकलेपणा विसरतो. एकदा चैतन्यच्या आजी आजारी झाल्या. आजीसाठी चैतन्यच्या आईने चार दिवस नोकरीवर जाणं बंद केलं. आजीला थोडं बरं वाटल्यावर ती नोकरीवर रुजू झाली. रजा तरी किती घेणार ? त्याचे बाबा पण कामावर जाणार व चैतन्यची शाळा. प्रत्येकाला आपला उद्योग होता. आजी फार समजूतदार. त्या म्हणाल्या, "तुम्ही सर्व आपआपल्या कामावर जा. माझी औषधं, पाणी व खायचं माझ्याजवळ आणून ठेवा. अधून मधून एकदा दोनदा शेजारच्या उमाला येऊन जायला सांगा. मला चिमण्यांची छान सोबत असते दुपारी.

माझी खूप करमणूक करतात चिमण्या. मी त्यांचा चिवचिवाट ऐकते, त्यांना न्याहाळते, त्यांचा खेळ पहाते. माझा एकटेपणा मी विसरते. आजारीपणाचा मला विसर पडतो.'

आहेत की नाही चिमण्या उपयोगी ? चिमण्या म्हणजे साधेसुधे करड्या राखोडी रंगाचे पक्षी. त्यांचा आवाज काही मधुर नसतो. त्या फार घोळ घालतात हे पण खरंच. आपल्या बागेतील फळांचा त्या फडशा पाडतात. पण जर का त्या एकदम नाहीशा झाल्या तर निसर्ग सुनासुना वाटेल, मानवाला चुकल्या-सारखं होईल ! चिमण्या म्हणजे उत्साही, आनंदी उमंग पक्षी. मी तर कधी दुःखी, खिन्न चिमणी पाहिलीच नाही.

आमच्या घरात एकदा एक लंगडा चिमणा आला. हळू-हळू तो घरचाच झाला. त्याला एक पाय जन्मतःच नव्हता की कोठल्या तरी लढाईत तुटला हे काही समजलं नाही. एक पाय नाही म्हणून त्याचा उत्साह, आनंद कमी झालेला नव्हता. तो आनंदाने चिवचिवे, एका पायावर नाचे व रात्री खिडकीच्या दारावर झोपे. मधूनच बाहेर चक्कर मारून येत असे. एकदा त्याने दुसऱ्या एका चिमण्याशी भांडून पत्नी मिळवून आणली. अन् मग दोघेजण चिवचिवाट करू लागले. त्यानं आमच्या माळ्यावर छान घरटं बांधलं. त्यांना मुलं झाली. तो व चिमणी त्यांची काळजी घेऊ लागली. आम्हाला हे सगळं पाहून खूप मजा वाटे. मुलं मोठी झाली अन् एक दिवस चिमणा चिमणी एकदम नाहीसे झाले! कदाचित त्यांना घरटं बांधायला दुसरी छान जागा मिळाली असेल. पण आम्हाला मात्र फार चुकल्याचुकल्यासारखं झालं.

चिमणी हा पक्षी खूप मजेदार व खेळकर पण आहे. एक दिवस मी मोड आलेले वाटाणे निवडत होते. त्यातला एक टणक वाटाणा मी खाली फेकला. इतक्यात आल्या चिमणाबाई चोच मारायला. पण मजाच झाली. चोच मारणार इतक्यात तो वाटाणा घरंगळला, कारण ती जागा उताराची होती. चिमणा-बाई गेल्या त्या वाटाण्याच्या मागे. वाटाणा सपाट जागेवर स्थिर झाला. चिमणीने तो चोचीत उचलला व परत वरच्या जागेवर आणून ठेवला व त्याला चोचीने थोडा धक्का दिला. परत तो घरंगळला व चिमणी त्याच्या मागे गेली. असा खेळ ती चिमणी बराच वेळ खेळत होती. छोट्या बेबीनं चिमणी पाहिली अन् टाळ्या वाजवल्या. याबरोबर मात्र ती उडून गेली.



एकदा चिमणीचं कुटुंब आमच्या घरात राहायला आलं. रोज चिवचिवाट करत, घिरट्या घालत. त्यांनी घरटं कुठं बांधलं ते मात्र मुळीच कळलं नाही. रोज चिमणा चिमणी दाणे आणत, काड्या आणत व केरकचरा करीत. मी म्हटलं, ' लक्ष ठेवून एक दोन दिवसांत त्यांना हाकललं पाहिजे. '

'नको ग. करू दे घर. मी आवरीन. मला त्यांचा चिवचिवाट, भांडण, प्रेम पाहायला फार आवडतं.' माझी मुलगी म्हणाली.

आमच्या दाराजवळच्या भिंतीला बरंच मोठं भोक पडलं होतं. दार बंद होईना. मग आणला सुतार. त्याने लाकडाचे तुकडे, भुसा वगैरे घालून ते भोक बंद केलं व दार छान बंद झालं. पण सुतार गेला अन् चिमणा चिमणीचं जोडपं चिवचिवाट करत घरभर फिरू लागलं. मी जेवायला बसले तर माझ्याभोवती चिवचिवाट करून घिरट्या घालू लागलं. चिमणीनं तर माझ्या दंडावर चोच मारली. मला कळेना त्यांना एकदम काय झालं ते. इतक्यात चिमणा भाताचा कण चोचीत उचलून घिरट्या घालताना दिसला अन् माझी ट्यूब पेटली. मनात आलं—दारामागचं भोक बंद केलं तिथं त्या चिमणीचं घरटं होतं की काय ! मी जेवण तसंच सोडलं व सुताराकडे जाऊन त्याला बोलावून आणलं. त्यानं बंद केलेलं भोक उघडलं व आत खोल हात घातला तो त्याला तिथं घरटं लागलं. हळूच बाहेर काढलं तर त्यात दोन पिल्लं होती. ती भुकेली झाली होती. सुदैवाने त्यांना इजा झाली नव्हती. मग ते घरटं चिमणा चिमणीला दिसेल असं ठेवलं. थोड्या वेळाने त्यांच्या घिरट्या व चिवचिवाट थांबला. चिमण्या मुक्या असल्या तरी त्या बुद्दू नाहीत. संकट आलं तर त्या हुषारीनं मार्ग काढतात. संकटाशी धैर्याने सामना देतात. त्या खेळकर आनंदी पण आहेत.

मुलांनो, चिमण्या दिसल्या नं म्हणजे थांबा ! ऐका त्या काय म्हणतात ते त्यांचं उडणं पहा. तुम्हाला त्यांच्याविषयी जरूर काही नवीन सांगायला मिळेल.

❀ ❀ ❀

# रमाचा रेनकोट

रमाला एकदाचा रेनकोट मिळाला अन् तोसुद्धा तिच्या आवडीचा–फिकट गुलाबी रंगाचा. मे महिन्याची सुटी झाली न झाली तोच रमा रेनकोटासाठी आईच्या मागे लागली. रेनकोट आणण्यासाठी रोज तिची भुणभुण चाले. तिची रोजची भुणभुण ऐकून आई कंटाळली व तिने सुरेशला म्हणजे रमाच्या बाबांना कोट आणायला सांगितलं. रमाच्या बाबांना, पाऊस पडत नसल्याने रेनकोट आणण्याची आठवण राहात नसे. कामाच्या गडबडीत ते विसरून जात.

कसं कोण जाणे, पण रमाच्या बाबांनी एक जूनला रमासाठी आठवणीने छानसा रेनकोट आणला. रमा खूश झाली व आनंदाने नाचू लागली. तिचं रेनकोटबद्दलचं स्वप्न प्रत्यक्षात उतरलं होतं. त्या दिवशी तिचं लक्ष अभ्यासात लागेना. तिनं रेनकोट घातला व घरातच्या मोठ्या आरशासमोर उभी राहिली. थोड्या वेळाने कोट काढला. नीट घडी केली व शेजारच्या गमूला दाखवायला गेली. गमू होता अकरा वर्षांचा व रमा दहा वर्षांची. रमा त्याला गमूदादा म्हणे. ' गमूदादा, बघ मला बाबांनी काय आणलंय ते. माझी आवडती वस्तु. ' तिनं पटकन् आपल्या रेनकोटची घडी उघडली व त्याला कोट दाखवला ?'

' रमा, कोट घालून दाखव ना ! ' गमू म्हणाला.

गमूकडे त्याला शिकवायला वासुदेव गुरुजी आले होते. ते म्हातारे होते. असावं वय साठीच्या आसपास. वाढती महागाई व दारिद्र्य यामुळे त्यांना शिकवण्या कराव्या लागत. रमाने

रेनकोट घातला व ताठ उभी राहिली. तिला पाहून गुरुजी म्हणाले, ' वा ! फारच छान दिसतेस हं. चुणचुणीत दिसतेस या रेनकोटात. '



रमा हे ऐकून खूश झाली व लाजलीसुद्धा. तिला वासुदेव गुरुजी खूप आवडले. तिने गुरुजींना नमस्कार केला व घरी गेली. दुसऱ्या दिवशी ती लौकर उठली. आकाशाकडे पाहू लागली पण आकाशात एकसुद्धा ढग नव्हता. ती खूपच निराश झाली व आईकडे गेली. आई चहा करण्याच्या गडबडीत होती. आईला रमा म्हणाली, ' आई, पावसाचं चिन्ह नाही. माझ्या रेनकोटचा उपयोगच होणार नाही. '

' इतकी कां निराश होतेस ? आपल्याकडे पाऊस दहा, बारा जूनला येतो. अजून चांगले आठ, नऊ दिवस आहेत पाऊस यायला. यावर्षी अगदी खूप पाऊस येणार. ' आईने रमाला समजावलं.

रमाने रेनकोटची घडी आपल्या शाळेच्या दप्तरात ठेवली. तिला वाटलं, दहा जूनच्या आधीच पाऊस आला तर असावा रेनकोट जवळ. काही दिवस गेले. पण पाऊस आलाच नाही.

एक दिवस शाळेतून येताना तिला वासुदेव गुरुजी भेटले. त्यांनी रमाला ओळखलं व विचारलं, 'कशी आहेस ? शाळेतून घरी निघालीस का ?'

रमा हसून म्हणाली, 'होय गुरुजी, आपण कुठं निघालात?'

'मी आता शिकवणीला जातोय. तू संभाळून जा हं' असं बोलून गुरुजी झपाट्याने चालू लागले.

रमाला आठवलं, एकदा गमूदादा तिला म्हणाला होता, 'गुरुजींची गरीबी आहे.' तिला गुरुजींकडे पाहून वाटलं, गमू म्हणाला ते खरं असावं. त्यांचे कपडे मळकट होते, छत्री फाटकी होती. रमा गमूदादाकडे एकदा गेली होती तेव्हा गमूदादाची आई म्हणाली होती, 'काय उपयोग त्यांच्या छत्रीचा मोठ्या पावसात ? किती भोकं आहेत तिला.'

त्यावर गमूदादाचे वडील म्हणाले होते, 'मी त्यांना नवी छत्री आणून देणार आहे.' हे सगळं रमाला आठवलं. गुरुजींकडे जुनीच फाटलेली छत्री तिला दिसली. तिला वाटलं– मोठी माणसं फार गोष्टी विसरतात. घरी जाईपर्यंत रमाच्या मनात हेच विचार घोळत होते.

रोज रमा उठली की आकाशाकडे नजर फेकत असे. आकाश स्वच्छ दिसे. ती निराश होई. जूनची दहा तारीख गेली. रमाला वाटलं, पाऊस येणार तरी कधी ? परत एकदा तिनं आईला विचारलं, 'आई, जूनची पंधरा तारीख आली ग, पण पावसाचा पत्ता नाही.'

'काळजी करू नकोस. पाऊस आला की इतका येईल की तू कंटाळशील.'

रमाचं लक्ष अभ्यासात, जेवणात लागेनासं झालं. तिचं लक्ष सतत आकाशाकडे असे. एक दोन दिवस गेले. शनिवार उजाडला. त्या शनिवारी तिला तिच्या मैत्रिणीकडे पार्टीला जायचं होतं. मैत्रिणीचा वाढदिवस होता. खूप मजा येणार होती. मैत्रिणीचे वडील घरी सिनेमा दाखवणार होते, जादूचे खेळ होते, अन् खाणपिणं.

दुपारभर पाऊस नव्हता, पण पार्टीला जाताना कसा कोणजाणे रेनकोट बरोबर घेतला. मनात निश्चय केला, पाऊस आला नाही तर परत कधी रेनकोट वापरायचा नाही. अन् काय आश्चर्य ! पार्टी संपत आली अन् एकदम आकाशात ढग जमले, विजा चमकू लागल्या, पाऊस पडू लागला. रमाचं घर तसं तिच्या मैत्रिणीच्या घरापासून जवळच होतं. पार्टी संपल्या-बरोबर रमाने मैत्रिणीचा निरोप घेतला व रेनकोट घालून निघाली.

तिला पावसाचा आवाज खूप आवडला. ती खूप आनंदात निघाली. तिच्या घराजवळ एक देऊळ होतं. तेथपर्यंत ती आली. तेथे तिला झाडाच्या आडोशाला उभे असलेले वासुदेव गुरुजी दिसले. ते पाऊस थांबायची वाट पहात उभे होते. त्यांच्याजवळ नेहमीची फाटकी छत्री होती. पण पाऊस जोराचा होता. छत्री त्यांना संरक्षण देऊ शकणार नव्हती. रमा त्यांच्याजवळ गेली व तिने विचारलं, 'गुरुजी, तुम्हाला बसस्टॉपवर जायचं आहे का ?'

'होय. शेवटची शिकवणी आहे. एकदमच पाऊस कोसळला.'

'मी माझा रेनकोट देऊ ? माझं घर जवळच आहे. मी धावत जाईन घरी.'

त्या छोट्या मुलीच्या भावनेने गुरुजी हेलावले. ते म्हणाले, 'माझी छत्री जुनी झालीय. तिचा उपयोग नाही या जोराच्या पावसात. आता मी नवीन घेईन. मला शिकवणीला जायलाच हवं. कारण मुलं माझ्यावर विसंबून असतात. पावसाळा मला त्रासाचा जातो. पाऊस कमी झालाय. आता थांबेल.'

'माझ्यासारखा रेनकोट घ्या नं गुरुजी. किती मजा वाटते पावसात रेनकोट घालायला.'

'खरंच मजा वाटेल. पण!' इतक्यात पाऊस कमी झाला. गुरुजी बसकडे निघाले. रमा त्यांच्याबरोबर बस स्टॉपपर्यन्त गेली. बस लगेचच आली. बसमध्ये चढण्याआधी गुरुजींनी रमाचा हात हातात घेतला व म्हणाले, 'तू फार चांगली मुलगी आहेस. मला सोबत केलीस व बसपर्यन्त यायला मदत केलीस.' वासुदेव गुरुजी बसमधून गेले. रमापण घरी निघाली तिच्या मनात आलं, गुरुजी शिकवणीला जातील. उशीरा घरी पोहोचतील अन् मग खूप थकतील. पुन्हा पाऊस आला तर भिजतीलसुद्धा!

रमा घरी गेली. विशेष काही न बोलता झोपली. सकाळी उठल्यावर ती दूध पीत होती तेव्हा आई म्हणाली, 'काल तुला पावसात खूप मजा वाटली नं ? रेनकोट घालून पावसात मिरवलीस नं ? आज परत आकाश स्वच्छ झालंय. तुला वाईट वाटतंय नं पाऊस नाही म्हणून ?'

'असं कां विचारतेस आई ? '

' अग, बघ नं आकाशाकडे. काल खूप पाऊस पडला अन् आज नाहीसा झाला. जणू काही सुट्टी घालवायला आला होता तो परत घरी गेला. '

रमाने गॅलरीत जाऊन आकाशाकडे पाहिलं व आईकडे येऊन म्हणाली, ' आई, मला आता पाऊस आनंद देत नाही. नकोच यायला पाऊस. '

रमाला वासुदेवगुरुजींचा प्रेमळ पण पावसामुळे हवालदिल झालेला चेहेरा आठवला व तो आईला म्हणाली, ' आई, मला स्वच्छ आकाशच आवडतं. '

आई तिच्याकडे आश्चर्याने पहात राहिली !

# एक आगळं मांजरीचं पिल्लू

ती रविवारची संध्याकाळ होती. पाऊस धो धो पडत होता. खिडकीच्या काचेवर पावसाचे टपोरे थेंब पडले की ' टप् टप् ' असा आवाज येत होता. आदित्य व बेला खिडकीत बसून पाऊस पाहत होते. खिडकीच्या काचेवरून पाणी वाहात होतं. पाऊस पाहता पाहता आदित्य म्हणाला, ' बेला, चल नं. आपण पावसातून फिरून येऊ. आपले नवीन रेनकोट घालू या. खूप मजा येईल. '

' खरंच. चल. खूपच मज्जा ! ' बेला उडी मारून बोलली.

आदित्य आठ वर्षांचा व बेला सहा वर्षांची होती. त्यांची आई जवळच बेलासाठी स्वेटर विणत बसली होती. तिनं मुलांचं बोलणं ऐकलं व ती म्हणाली, ' आज तुम्हाला घरातच खेळलं पाहिजे. धुवांधार पाऊस पडतोय. सर्दी होईल. बेला थोडी खोकतेय. '

त्यावर आदित्य म्हणाला, ' बेला, आपण शाळा शाळा खेळू या. मी गुरुजी, तू विद्यार्थिनी. '

त्या दोघांनी खेळायची तयारी करायला सुरुवात केली. इतक्यात दारावरची घंटी वाजली. ' तुम्ही खेळा. मी पहाते कोण आहे ते. ' असं म्हणत आई उठली. पाठोपाठ मुलंही गेली. आईनं दार उघडलं तर दारात एक छोटा मुलगा–बेलाच्याच वयाचा असावा–त्यानं गुलाबी रंगाचा रेनकोट घातला होता. हातात एक छोटं गुबगुबीत मांजरीचं पिल्लू. त्या पिल्लाचा रंग काळा व त्यावर पांढरे ठिपके होते. मोठं गोड दिसत होतं पिल्लू.

त्या मुलाने ते पिल्लू पुढे केलं व विचारलं, 'तुमचं मांजरीचं पिल्लू हरवलंय का ? मला हे तुमच्या घरासमोर सापडलं.'

'आम्ही मांजर पाळलेलं नाही.' आई म्हणाली. इतक्यात आदित्य म्हणाला, 'पाळू या नं आई, ते किती छान आहे.'

'मला पण आवडलंय.' बेला आईचा पदर ओढत म्हणाली.

त्या पिल्लाकडे पहात आई म्हणाली, 'थंडीनं गारठलंय. थोडा वेळ ठेवू या. आजुबाजूचं कोणाचं असेल तर विचारू.' त्या मुलानं ते पिल्लू आईच्या हातात दिलं.

'तू फार दयाळू व चांगला मुलगा आहेस. मी ठेवते हे पिल्लू. पाऊस थांबल्यावर कोणाचं असेल तर विचारू व देऊ.' आईचं बोलणं ऐकून तो मुलगा हसला व गेला. आदित्य–बेलाने त्या पिल्लाला घेतलं व कुरवाळलं. थोड्या वेळाने घरात नेलं. आईने त्याला बशीत दूध दिलं. पिल्लाने दूध झटकन् पिऊन टाकलं. ते पाहून आदित्य म्हणाला, 'बिचारं भुकेलं होतं.' बेलाने एक गरम कापडाचा तुकडा पसरला. त्यावर ते झोपलं. थोड्या वेळाने 'मँऽऽव मँऽऽव' करू लागलं. जणू काही ते सांगत होतं 'मला आता बरं वाटतयं.'

थोड्या वेळाने पाऊस थांबला. आई मुलांना म्हणाली, 'शेजारच्या तीन चार घरी जाऊन विचारून या, कोणाचं मांजरीचं पिल्लू हरवलंय की काय ते.' मुलांना पिल्लू हवं होतं पण आईचं ऐकणं भाग होतं. दोन्ही मुलं जड पावलांनी शेजारच्या घरी गेली. त्यांनी दार वाजवलं. एका छोट्या मुलीनं दार उघडल्यावर बेलानं विचारलं, 'तुमचं माजरीचं पिल्लू हरवलंय का ?'

'नाही. आमचं पिल्लू तर झोपलंय. एवढं बोलून त्या मुलीने दार बंद केलं. मग ती मुलं आणखी चार पाच घरी चौकशीला गेली, पण कोणाचंच पिल्लू हरवलेलं नव्हतं. दोन्ही मुलं आनंदाने धावतच घरी आली. त्यामुळे त्यांना दम लागला होता. थोडा वेळ कोणी काहीच बोललं नाही. थोड्या वेळाने बेला म्हणाली, 'कोणाचंच पिल्लू हरवलेलं नाही. आपण हे पिल्लू ठेवू या का आई ?'

आईनं पिल्लाला थोपटलं व म्हणाली, 'कोणाचंच हे पिल्लू नाही. मग ठेवा तुम्ही. पण त्याची नीट निगा राखा. त्याला छान ठेवा.'

'आई, तू किती चांगली आहेस' आदित्य आईच्या गळ्यात हात अडकवून म्हणाला. इतक्यात त्या पिल्लाने आईच्या मांडीवरून उडी मारली व आदित्यजवळ जाऊन



त्याचे पाय चाटायला सुरुवात केली.

'तू आमच्याजवळ राहाणार म्हणून तुला आनंद झाला नं?' आदित्यने पिल्लाला उचलून घेऊन विचारलं. पिल्लाने 'मॅऽऽ व मॅऽऽव करत आनंद व्यक्त केला.

ते पिल्लू खूप खेळकर होतं. मुलं त्याच्याशी खूप खेळायची. एक दिवस मुलांचे आईबाबा बाहेर गेले होते. मुलं घरात एकटीच होती. ती लपंडाव खेळत होती. खेळता खेळता कपाटाच्या बाजूला लपली. इतक्यात, उंदीर दिसला म्हणून ते मांजरीचं पिल्लू शेजारच्या फळीवर चढलं. इतक्यात कपाटावर ठेवलेल्या बशांना आदित्यचा धक्का लागून काचेच्या बशा फुटल्या. दोन्ही मुलं घाबरली. आता काय? दोघा मुलांनी संगनमत करून पिल्लाचं नाव आईला सांगायचं ठरवलं.

आईने घरी आल्यावर बशा फुटलेल्या पाहून विचारलं, 'बशा कशा फुटल्या?' त्यावर आदित्य म्हणाला, 'पिल्लाने कपाटावर उंदीर पाहिला अन् उडी घेतली तर बशा पडल्या व फुटल्या.'

आई मग मुलांना काहीच बोलली नाही. त्यानंतर पुन्हा एकदा दुपारी चारच्या सुमारास आई भाजी आणायला गेली. तिनं जायच्या आधी दोन्ही मुलांसाठी दोन ग्लासभर दूध टेबलावर ठेवलं व त्यांना ते पटकन् प्यायला सांगितलं. दोन्ही मुलं गाडी गाडी खेळत होती. खेळता खेळता टेबलाजवळ आली. टेबलाला बेलाचा जोराने धक्का लागला दोन्ही ग्लास खाली पडले व फुटले. दूध वाहू लागलं. ते मात्र त्या पिल्लाने चाटलं.

आई घरी आल्यावर आदित्य म्हणाला, 'आई, पिल्लाने ग्लास फोडले व दूध गट्टम् केलं.' त्यावर आई म्हणाली, 'नेहमी नेहमी तुमचं पिल्लू असं करू लागलं तर विचार करावा लागेल.'

त्यानंतर तीनचार वेळा असंच काही घडलं अन् मुलांनी ते पिल्लावर घातलं. मग मात्र आई रागावली व पिल्लाला घेऊन घरापासून दूर तीन चार किलोमीटर दूर, झोपडपट्टी होती तिथं गेली. तेथील मुलांना ते पिल्लू देऊन आली. मुलं-पण आईबरोबर गेली होती. आईनंपिल्लू कोणाला दिलं ते मुलांनी पाहून ठेवलं.

झोपडपट्टीतील मुलांना ते पिल्लू खूप आवडलं. घरी आल्यावर मुलांची तोंडं चिमणीएवढी झाली होती. त्यांना पिल्लाशिवाय चैन पडेना. दोन्ही मुलांनी विचारविनिमय करून आईला खरं सांगायचं ठरवलं. मग दोन्ही मुलं आईजवळ गेली व घडलेली खरी हकीगत सांगितली व रडू लागली.काही वेळाने रडू थांबलं. मग आदित्यने आईला विचारलं, 'आम्ही जाऊन ते पिल्लू आणू का ?'

'मिळालं तर आणा. पण पुन्हा त्या मुक्या प्राण्यावर खोटा आळ घेतलेला मला खपणार नाही.'

दोन्ही मुलं पडत्या फळाची आज्ञा समजून पिल्लू आणायला गेली. त्या झोपडपट्टीतली मुलं त्या पिल्लाशी खेळण्यात इतकी रंगली होती की, ती ते पिल्लू द्यायला तयार नव्हती. एवढंच काय, पण ते पिल्लूपण आदित्य-बेलाला पाहून दूर पळालं. मुलं खिन्न मनानं घरी परतली व घडलेलं सगळं आईला सांगितलं.

'तुम्ही, त्या पिल्लावर खोटा आळ घेतलात ते त्याला आवडलं नाही. आता खरं बोलत जा व नीट वागा. दुसरं पिल्लू मिळालं तर आणू.' आईने म्हटलं.

'आई, आता आम्ही असं वागणार नाही.' हुंदके देत बेला म्हणाली. आदित्य रडू लागला. इतक्यात त्यांच्या शेजारच्या तिसऱ्या घरात राहाणाऱ्या सीताबाई आल्या व मुलांच्या आईला विचारू लागल्या, 'आमच्या मांजरीला चार पिल्लं झालीत. एक फार सुरेख आहे. पांढरं शुभ्र व काळे ठिपके आहेत. तुम्हाला हवंय का?'

'आई, घे नं. आम्ही सांभाळू त्याला.' आदित्य म्हणाला.

आई हसून म्हणाली, 'सीताबाई, मुलांना पाठवते. ते पिल्लू तुम्ही त्यांना द्या.' सीताबाई मुलांना घेऊन गेल्या व त्यांना पिल्लू दिलं.

त्यानंतर मात्र त्या दोन्ही मुलांनी त्या पिल्लावर खोटे आळ घेतले नाहीत व पिल्लाला छान सांभाळलं.

# विकास व शुभा प्रवासाला जातात !

विकास व शुभा एका खेड्यात राहात होती. त्यांची आई तेथे परिचारिका होती. वडील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक होते. विकास आठवीत होता व शुभा सहावीत शिकत होती. त्यांचं घर म्हणजे छोटी पर्णकुटी होती. मागे-पुढे थोडी जागा होती. कुटुंब छोटं पण आनंदी होतं. कुटुंबाचा निर्वाह जेमतेम होत होता. तरीदेखील रागलोभ त्या कुटुंबापासून दूर होते. मुले व मुलांचे बाबा आईला घरकामात मदत करत. संध्याकाळी सर्वजण एकत्र जमत व गप्पागोष्टी करीत मजेत वेळ घालवीत.

या कुटुंबाच्या पर्णकुटीच्या शेजारी एका मोठ्या साखर कारखानदाराचा मोठा बंगला होता. त्या बंगल्यात तीन ते चारच माणसं होती. एक नोकर, एक माळी, म्हातारी आई व स्वतः मालक. मालक बहुतेक बाहेरगावीच असे. त्यामुळे त्या बंगल्याची देखभाल म्हणावी तशी होत नव्हती. मालक बाहेरगावी गेला की बंगल्यात त्याची म्हातारी आई, नोकर व माळी. हे असत. माळी आठवड्यातून दोनदाच येत असे.

शुभा व विकास यांना उन्हाळ्याची सुट्टी लागली होती. त्यांच्या बरोबरीची मुलं कोणी महाबळेश्वर, कोणी पांचगणी, कोणी लोणावळा अशा ठिकाणी गेली होती. विकास व शुभाला पण जावंसं वाटत होतं. शुभानं आईला म्हटलं, ' आई, आपण जायचं का बाहेरगावी ? '

त्यावर विकास म्हणाला, ' जाऊया नं. माझा मित्र खंडाळ्याला गेलाय. '

हे ऐकून आई म्हणाली, ' तुमचं म्हणणं ठीक आहे पण तुमच्या बाबांना सुट्टी हवी नं ?' आईला म्हणायचं होतं-इतके पैसे कुठून आणायचे ? पण मुलांना तसं सांगणं इष्ट नव्हतं. ती मुलांना म्हणाली, ' मी तुमच्या बाबांना विचारीन संध्याकाळी. आपण सर्वजणच विचार करू. ' त्यानंतर तो विषय संपला.

संध्याकाळी मुलं जमली. त्यांची आपसात कोण कुठं जाणार, कोण कुठं गेलं, याबद्दल चर्चा झाली. मग मुलं आपआपल्या घरी गेली. नंतर विकास व शुभा आपसात बोलू लागली. विकास म्हणाला, ' आपली आई तिच्या मैत्रिणीला सांगत होती, बाहेरगावी जायचं म्हणजे खूप पैसे हवेत. '

' खरंच, आपल्या आईला खूप काम करावं लागतं अन् बाबा पण कधी विश्रांति घेत नाहीत. ' शुभा म्हणाली.

' हे पहा शुभा, आपण या सुट्टीत काम करून पैसे मिळवू या. आपलं मन रमेल व कंटाळाही येणार नाही. मजा वाटेल आपल्याला. ' एवढं विकास बोलला तोच आईनं हाक मारली म्हणून दोघेजण घरात पळाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी मुलं बाहेर खेळत होती. शेजारच्या बंगल्याचा मालक त्याच्या बागेत उभा होता. तो मुलांकडे पाहून हसला. विकास तसा धीट होता. तो म्हणाला, ' काका, तुम्ही खूप दिवसांनी दिसलात ! '

' होय. मला नेहमी कामासाठी कधी मुंबई, कधी सांगली, तर कधी औरंगाबादला जावं लागतं. पहा नं, त्यामुळे माझ्या बागेची काय दुर्दशा झाली आहे ! माळीपण म्हातारा झालाय. त्याच्यानं तितकंसं काम होत नाही. '

' आम्ही करू तुमच्या बागेत काम ?' शुभाने विचारले.

'आम्हाला रोपं आणून द्या. आम्ही तुमची बाग फुलवू' विकासने सुचवले.

'रोज कराल बागकाम ? एक दिवस कराल अन् दुसऱ्या दिवशी नाही असं नाही चालायचं.' मालक हसून म्हणाला.

'मी व विकास आळीपाळीने पाणी देऊ बागेला.' शुभा म्हणाली. त्यावर विकासने पुस्ती जोडली, 'दोन महिन्यांत तुमची बाग हिरवीगार करू.'

'वेळ कशाला घालवायचा ? आजपासूनच कामाला सुरुवात करा. मी माळ्याला सांगतो रोपं आणून द्यायला. तो तुम्हाला थोडीफार मदतही करेल. त्याच्यानं फार काम होत नाही. फार म्हातारा झालाय. त्याला रजा देणंही योग्य नाही.'

'त्यानं आम्हाला मार्गदर्शन केलं तरी पुरे.' विकासनं सुचवलं.

'आजी पण आम्हाला मधून मधून मार्गदर्शन करतील.' चिमुकली शुभा म्हणाली.

त्यानंतर मुलं कामाला लागली. दुपारच्या जेवणाच्या वेळेपर्यंत मुलांनी अर्ध्याअधिक बागेतील तण काढून बाग स्वच्छ केली. दुपारचे बारा वाजले तसे घरी जेवायला गेले. जेवताना आईनं विचारलं, 'आज कोणत्या कामात गुंतला होतात ? आज मला सुट्टी आहे पण तुम्ही दोघेही जराही घरात डोकावला नाहीत.' त्यावर विकास म्हणाला, 'आम्हाला मनासारखं काम मिळालं आहे.'

'आई, आमचं आवडतं बागकाम आम्ही करतोय.' शुभा म्हणाली.

'कोणाच्या बागेत काम करता? जमेल का तुम्हाला काम?' आईनं विचारलं.

'हो. जमेल की. न जमायला काय झालं? अग आई, खूप मजा वाटते काम करायला. आपल्या शेजारच्या बंगल्या-भोवती जी बाग आहे ती आम्ही फुलवणार आहोत.' विकासने माहिती दिली.

'बरं झालं. तुमचा कंटाळा गेला असेल. छान आवडतं काम मिळालं तुम्हाला.' आई हसून म्हणाली.

विकास, शुभा रोजच सकाळ-संध्याकाळ तर कधी कधी दुपारीसुद्धा बागेत खपत होती. त्या बंगल्याचा माळी, म्हातारा नोकर हेसुद्धा बागकामात रस घेऊ लागले. मुलांना मदत करू लागले. मुलांनी जाई, जुई, शेवंती, गुलाब वगैरे फुलझाडं लावली. मागच्या बाजूला मेथी, कोथिंबीर, मिरच्या वगैरेचे



वाफे तयार केले. माळयाने मग चिकू, आंबा, पेरू वगैरे फळझाडांची रोपं आणून लावली.

मुलं रोज झाडांना पाणी घालत, झाडांची काळजी घेत. मुलांची आजीशीपण गट्टी झाली. आजी त्यांना गोष्टी सांगे, खाऊ देई. पंधरावीस दिवसांनी बागेला थोडा हिरवटपणा आला. आजी बागेत खुर्ची टाकून बसू लागल्या. त्या मुलांना म्हणाल्या, ' तुमच्यामुळे माझा वेळ चांगला जातो. बागही छान दिसू लागलीय. बागेबरोबर तुम्ही माझीही काळजी घेता. '

' आजी, आम्हाला सुट्टीत काम मिळालं. सुट्टीचे पंधरा दिवस चांगले गेले. अजून महिनाभर सुट्टी आहे. ' विकास म्हणाला.

अशा तऱ्हेने दिवस मजेत जात होते. काय झालं कोणास माहीत, चारपाच दिवस गेले अन् आजी एकदम आजारी झाली. मुलं तिच्याजवळ बसत होती. तिचं औषधपाणी करीत होती. घराच्या मालकाला आईच्या आजारपणाविषयी कळवलं गेलं. तो तातडीने मुंबईहून आला. त्याने मग आईचे औषधपाणी बघायला सुरुवात केली. बाग पाहून तो खुश झाला. दोनचार दिवसांनी आईची तब्येत सुधारू लागली.

आईने आपल्या मुलाला, विकास व शुभा तिची काळजी घेत होती ते सांगितलं. पाचसहा दिवस गेले. आई बरी झाली. अशक्तपणा होता. त्या मालकाने मुलांना म्हटलं, ' आई मला सांगत होती, तुमची आई परिचारिका आहे. माझ्या आईला ८-१० दिवस हवा पालटायला महाबळेश्वरला न्यायचं आहे. तुमची आई जाईल का ? '

हे ऐकलं पण मुलं काहीच बोलली नाहीत. मग मालक म्हणाले, ' मला घेऊन चला तुमच्या बाबांकडे. ते घरी आहेत नं ?'

' हो, बाबा संध्याकाळी घरीच असतात.' शुभा म्हणाली. मालक त्या दोन मुलांसह त्यांच्या घरी गेले. त्यांच्या बाबांशी बोलता बोलता म्हणाले, ' तुमच्या मुलांनी माझी बाग छान फुलवली.'

' मुलांना काम हवंच असतं. बागकाम करायला तर त्यांना फार आवडतं.' मुलांचे बाबा हसून म्हणाले.

' मी आपल्याला व वहिनींना एक विनंती करायला आलोय. त्या आहेत नं घरात ?'

' आहेत नं.' बाबा विकासकडे वळून म्हणाले, ' आईला बोलाव बरं.' इतक्यात मुलांची आई सर्वांसाठी चहा घेऊन आली.

त्यांना पाहून मालक म्हणाले, ' मी माझ्या आईला हवाबदल करण्यासाठी महाबळेश्वरला पाठवावं म्हणतोय. तिच्या-बरोबर कोणीतरी जबाबदार व ती आजारी झाली तर तिची काळजी घेणारं माणूस हवं. आपण परिचारिका आहात असं समजलं. आपण जाल का ? माझी आई तुमच्या मुलांना बरोबर नेणार म्हणते. त्यांनी तिला खूप माया लावलीय.'

हे ऐकून मुलांचे बाबा म्हणाले, ' आठ दिवसांचा प्रश्न आहे तर जाऊन ये. मुलांनाही बदल होईल.'

' पण ऽ ऽ'

'वहिनी, पणबीण काही नाही. मी मुलांच्या बाबांनाही विनंती करतो की त्यांनीही आठ दिवस सुट्टी घ्यावी. मी सगळ्यांचीच तिथं राहण्याची व्यवस्था करतो. माझ्या गाडीनं जायचं व परत यायचं. तुम्हाला प्रवासाचा मुळीच त्रास होणार नाही.'

'बाबांनी सुट्टी घेतलीय.' शुभा म्हणाली.

'सगळेच कशाला?' मुलांचे बाबा संकोचून म्हणाले.

'आता काहीच बोलू नका. आमचे डॉक्टर मला म्हणालेत, आईला चार दिवसांनी महाबळेश्वरला पाठवायला हरकत नाही. तुमच्या मुलांनी माझी बाग इतकी छान केलीय की त्यांना काहीतरी बक्षिस द्यायला हवंच. आता जायचं ठरलं हं.' असं बोलून मालक गेलेसुद्धा.

'विकास, शुभा, तुम्ही काही अपेक्षा न करता छान काम केलंत त्याचं हे बक्षिस तुम्हाला मिळालं.' आई म्हणाली.

'शुभा, खूप मजा येईल महाबळेश्वरला. नाही?' असं म्हणून विकास नाचू लागला.

# सुनीलभय्याची दुर्बिण

सीमा व रोहन बहीण-भाऊ. ही जुळी भावंडं असतील सुमारे दहा-बारा वर्षांची. त्यांचं एकमेकांवर खूप प्रेम होतं. सीमा निरागस, हुशार व मायाळू होती. तसाच रोहनही.

एकदा शाळेत मुलं लपंडाव खेळत होती. खेळताना सीमाच्या उजव्या पायात भली मोठी काच घुसली. तिला डॉक्टरांकडे नेले, काच काढली, औषधोपचार केले पण पाय



दुखायचा थांबला नाही. लहान गावातील डॉक्टरांकडून चुकून काचेचा तुकडा आत राहिला की काय कोण जाणे! तिची जखम पिकली, पाय सुजला. मग तिला शहरातील मोठ्या दवाखान्यात नेलं. घोट्यापासून पाय कापला तरच

दुखणं थांबेल, नाही तर पुढे सबंध पाय निकामी होईल असे तेथे सांगण्यात आले. तिच्या पायावर शस्त्रक्रिया केली जाऊन घोट्यापासून पाय कापला गेला. शस्त्रक्रियेनंतर शुद्धीवर आल्यावर सीमा खूप रडली. यापुढे ती भरतनाट्यम् नृत्य शिकू शकणार नव्हती, याचं ते दुःख होतं.

सीमा तुडतुडीत, चलाख होती. ऑपरेशननंतर १५-२० दिवसांनी ती कुबड्यांच्या आधाराने चालू लागली. डॉक्टरांनी तिला घरी पाठवताना बजावले, 'फार मेहनत घेऊ नकोस. पायांना विश्रांती दे. निदान दोन महिने खूप विश्रांती दे पायांना.'

सीमा आपल्या पारगावी आली अन् तिला वार्षिक परीक्षेची आठवण झाली. ती रोहनला म्हणाली, 'रोहन, वार्षिक परीक्षा संपल्या नं? निकाल कळला का?'

ते ऐकून आई म्हणाली,'निकाल कळेल दोनचार दिवसात.' तू काही काळजी करू नकोस. तुला वरच्या वर्गात घातलंय.'

'खरंच ? अन् ते कसं ?'

'वर्षभरात घेतलेल्या चाचण्यांत तू ७० टक्के मार्क मिळवले आहेत. म्हणून बाईंनी निर्णय घेतला तुला वरच्या वर्गात घालायचा.' रोहनने माहिती पुरवली.

'पण आई, मला एक गोष्ट खटकतेय. मी आमच्या शाळेच्या खो खोच्या संघाची प्रमुख आहे. आता मला काढून टाकतील.' सीमाचे डोळे बोलता बोलता भरून आले. आईला पण ते ऐकून भडभडून आले पण तिने स्वतःला सावरले व म्हटले, 'तुला बुद्धिबळाचा खेळ आवडतो नं खूप? त्यात प्राविण्य मिळव त्या रोहिणी खाडीलकरसारखं. तुला सतार

वादनातपण रस आहे. सतार शीक.' एवढे बोलून तिने रोह-नला हाक मारली व सांगितले, 'तुम्ही दोघे बुद्धिबळ खेळा. मी तुमच्यासाठी खायला करते.'

रोहन व सीमा बुद्धिबळ खेळत बसली. थोड्या वेळाने आईने खायचं आणून दिलं. त्या वेळी खूप अंधार पडला होता. 'खूपच काळोख झाला. वेळ कसा गेला ते कळलंच नाही. रोहन, तुला खेळायला नाही का जायचं?' सीमाने विचारले.

'आपण खेळतच तर होतो.' एवढं रोहन बोलला तोच सीमा म्हणाली, 'रोहन, तू संध्याकाळी बाहेर खेळायला जायला हवं. नाही तर मी तुझ्याशी कट्टी करीन. मी उद्यापासून सतार शिकणार. जा रोहन, तू थोडं फिरून ये.'

सीमाच्या आग्रहामुळे रोहन बऱ्याच दिवसांनी नदीकाठी गेला. रोज मुलं तेथे जमत. रोहन-सीमाचं पारगाव छोटं पण पुढारलेलं होतं. रोहन आलेला पाहून मुलं ओरडली. 'रोहन आला, रोहन आला.' दुसरा एक मुलगा त्याच्याकडे जाऊन म्हणाला, 'आपला सुनीलभय्या दिल्लीहून आलाय. एक महि-न्याची रजा घेतली पायलट सुनीलभय्याने. काय मस्त दुर्बिण आणली आहे रे त्याने?'

इतक्यात सुनीलभय्या तेथे दुर्बिण घेऊन आला. मुलांनी त्याच्याभोवती एकच गर्दी केली. सुनीलभय्याने दुर्बिण साधारण उंच जागी नीट बसवली. मुलांची रांग लावली दुर्बिणीतून पाह-ण्यासाठी. पण मुलंच ती. थोड्याच वेळात पाठीमागच्या मुलांची सहनशक्ती संपली. दुर्बिण पाहण्यासाठी मारामारी सुरू झाली. सुनीलभय्याने जाहीर केलं, 'उद्यापासून दुर्बिण पहायला

५० पैसे. जर कोणी परीक्षेत पहिल्या तीन नंबरात आला, खेळ, चित्रकला वगैरेत विशेष प्राविण्य मिळवलं तर मात्र दुर्बिण फुकट पहायला मिळेल. आज आता दुर्बिण पाहणं बंद.'

नंतर सुनीलभय्या घरी गेला. घरी जायला त्याला बराच उशीर झाला. त्याची आई त्याला म्हणाली, 'आज फार उशीर केलास?' त्यावर सुनीलने मुलांची भांडणं, मारामारी वगैरे गंमत सांगितली. त्यावर आई म्हणाली, 'एवढा पायलट झालास तरी अजून तू दुर्बिणीत व मुलांत रमतोस. लहानपणीसुद्धा तुला दुर्बिणीचं वेड होतं.'

'आई, तू आता ही झोपडी केव्हा सोडणार?' सुनीलने विषय बदलला.

'सुनील, मी एकटी मोठ्या घरात राहून काय करमणार मला? तू असतोस सदा दूर.'

'आई, या झोपडीत जी मजा आहे ती बंगल्यात नाही. इथे राहूनच मी विद्या शिकलो, मोठा झालो. या झोपडीशी माझं नातं जडलंय.' ती मायलेक असं व आणखीही बरंच, बराच वेळ बोलत बसली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी दुर्बिण पहायला मुलांनी पैसे आणले. मुलं शिस्तीत दुर्बिण पाहत होती. इतक्यात रोहन तेथे धावतच आला व म्हणाला, 'सुनीलभय्या, मी परीक्षेत पहिला आलो. हा पहा माझा निकाल. मला शिष्यवृत्ती मिळाली'!

सुनीलभय्याने त्याची पाठ थोपटली व म्हणाला, 'दुर्बिण पहायला तर मिळेलच तुला, पण बक्षिस काय देऊ? क्रिकेटचं सामान आवडेल?'

'भय्या, मला तसं काही नको. पण तू म्हणतोस तर एक मागू ?'

'माग नं.' सुनीलभय्या म्हणाला.

'माझी बहीण आजारी आहे. ती काही दिवस बाहेर जाऊ शकणार नाही. तिला पहायला एक दिवस दुर्बिण देशील ?'

'अरे पण तुला बक्षिस द्यायचंय' सुनीलभय्याने चिडवलं. रोहन नाराज झाला. सुनीलच्या ते लक्षात आलं. तो म्हणाला, 'घेऊन जा दुर्बिण. एवढा खट्टू का होतोस ? उद्या संध्याकाळी संभाळून आण हं !'

हे ऐकून रोहनला स्वर्ग हाती आल्याचा आनंद झाला. त्याला वाटलं, सीमा किती खूष होईल ! तो घरी धावतच गेला. सीमाच्या खोलीत गेला व तिला दुर्बिण दाखवून म्हणाला, 'उद्या तुझा वेळ छान जाईल. ही दुर्बिण मी तुझ्यासाठी सुनीलभय्याकडून आणलीय.'

'खरंच ? किती चांगला आहेस रे तू !' सीमा आनंदाने ओरडली.

दुसऱ्या दिवशी सीमा सकाळपासून दुर्बिणीतून पाहण्यात गुंतली होती. आकाशात दूर भिरभिरणारे पक्षी, दूरच्या जंगलातील जनावरं, नदीकाठची मजा वगैरे अनेक गोष्टी तिने पाहिल्या व त्यांचे वर्णन पुनःपुनः आईजवळ केले. दुपारचे जेवण व थोडी विश्रांती एवढा वेळच ती दुर्बिण सीमाजवळ नव्हती.

संध्याकाळ झाली तशी ती रोहनला म्हणाली, 'तू दुर्बिण नेतोस नं ! मी जरा स्टेशनपलीकडचा देखावा पहायचा राहिला आहे तो पाहून तुला देते दुर्बिण.' मग ती दुर्बिण पाहता पाहता

भाष्यही करू लागली, ' वा ! काय पण फटकावला चेंडू ! ती मुलगी वाऱ्यासारखी वेगाने धावतेय, शाबास! ' अन् मग मध्येच ओरडली, ' रोहन, त्या स्टेशनपलिकडच्या झोपडीला आग लागली वाटतं. हो, आगच ! ' एवढं ती म्हणाली तोच रोहन धावतच तिच्याजवळ गेला. त्याला ती म्हणाली, ' रोहन, आगीच्या बंबाला फोन कर जवळच्या सार्वजनिक टेलीफोनवरून. पळ लौकर. '

रोहन पळतच गेला व त्याने फोन केला. कोठे आग लागली ते कळवलं. मग बंबाच्या ऑफिसमधून विचारणा झाली, ' कोणी पाहिली आग ? त्या व्यक्तीचा पत्ता द्या. '

रोहनने सीमाचे नाव व पत्ता दिला. आगीचे बंब त्वरेने तेथे पोहोचले. पाणी मारून आग आटोक्यात आणली. इतक्यात झोपडीची मालकीण–सुनीलची आई कोठे बाहेर गेली होती ती आली. सुनीलपण घाईने तेथे आला. आईला सुखरूप पाहून त्याला बरे वाटले. आईने बंबवाल्यांना, ते तेथे कसे पोहोचले ते विचारले. ते म्हणाले, ' हा पहा पत्ता. इथून फोन आला. आग लागली न लागली तोच फोन आला म्हणून तुमची झोपडी व इतर झोपड्या वाचल्या. '

सुनीलच्या आईने तो पत्ता घेतला व सुनीलला म्हणाली, ' या पत्त्यावर तू स्वतः जा. आभार मान त्या मुलीचे. तिच्यामुळे फारसं नुकसान झालं नाही. '

सुनील पत्ता घेऊन शोधत शोधत रोहनच्या घराजवळ आला. तेथे त्याला रोहन भेटला. तो म्हणाला, ' सुनीलभय्या, मला उशीर झाला का ? मी तुझ्याकडेच निघालो आहे दुर्बिण घेऊन. '

'नाही, नाही. मी दुर्बिणीसाठी नाही आलो. इथूनच कोण्या एका मुलीने माझ्या झोपडीला आग लागल्याचा फोन केला. तिचे आभार मानायला तिचे घर शोधतोय.'

'भय्या, ती तुझी झोपडी होती ? अरे, ती माझीच बहीण, तुझ्याच दुर्बिणीतून पहात होती ! अन् तिला आग लागल्याचं दिसलं. तिनेच मला बंबवाल्यांना फोन करायला पाठवलं.'

'चल तर. मला ने तिच्याकडे.' सुनील म्हणाला. मग सुनील व रोहन सीमाच्या खोलीत गेले. सीमाचा कापलेला पाय पाहून सुनील दचकलाच. मग तो म्हणाला, 'फार आभारी आहे तुझा. तुझ्यामुळे माझी झोपडी व इतर झोपड्याही वाचल्या.'

'रोहन सांगतो मला तुमच्याविषयी. तुम्ही दुर्बिण दिली. माझा वेळ छान गेला. तुम्ही दुर्बिणीचे आभार माना. तिच्यामुळे कळलं मला आग लागल्याचं' सीमा उठून बसत बोलली.

'दुर्बिणीपेक्षा दुर्बिणीतून पहाणाऱ्याची कळकळ व हुशारी अधिक !' असं बोलून सुनीलभय्याने रोहनकडून दुर्बिण घेतली व सीमाच्या हातात दिली व म्हणाला. 'तुझा वेळ चांगला जाऊ दे. रोहन, तुला मी उद्या क्रिकेटचं सामान देईन हं.'

सीमा व रोहन क्षणभर त्याच्याकडे पहातच राहिले. मग सीमा म्हणाली, 'भय्या, हे तर आमचं कर्तव्यच होतं. यात अधिक काय केलं ?'

'सीमा, तू तुझं दु:ख विसरून दुसऱ्याच्या कल्याणाचा विचार केलास. स्वतः दीन-दुबळी आहेस असं तुला वाटलं नाही. अशा माझ्या शहाण्या बहिणीला हे बक्षिस म्हणजे काहीच नाही!'

मग सुनीलभय्या रोहनला घेऊन घरी जायला निघाला.

BVBK-0402904

# तुषार चित्रकार होतो

तुषार चवथीच्या वर्गात चांगल्या तऱ्हेने पास झाला व चवथीत गेला. जून महिन्यात शाळा उघडल्या अन् तो आजारी पडला. त्याच्या आईबाबांना वाटलं, असेल सर्दीपडश्याचा ताप, म्हणून आठ दिवस घरगुती उपचार केले. ताप काही हटेना. डॉक्टरना बोलावलं. तापाचं निदान विषमज्वर असं झालं. ताप चांगला ४२ दिवस सतत होता. त्यानंतर तो कमी झाला पण या तापाने तुषारची शक्ति पार गेली. त्याला सुधारायला चांगले चार महिने लागले, तरी पण त्याचा अशक्तपणा राहिलाच.

तो शाळेत जाऊ लागला पण त्या वर्षी तो काही परीक्षेत पास झाला नाही. दुसऱ्या वर्षी तीच गत. परीक्षेचा निकाल वाचताना त्याच्या बाई त्याला म्हणाल्या ‘तुषार, वर्गात कोणी-तरी शेवटचा नंबर असणारच. पण तूच नेहमी तो नंबर घेतला पाहिजेस का ?’

तुषारला बाईंचं हे बोलणं फार लागलं. त्याला वाटलं, आपण अभ्यास तर करतो पण आपल्या लक्षातच काही राहात नाही. त्याने बाईंचं बोलणं आईबाबांना सांगितलं नाही. त्यांना खूप वाईट वाटेल याची त्याला जाणीव होती. त्याच्या आजाराचा त्याच्या स्मरणशक्तीवर, बुद्धीवर परिणाम झाला होता. तुषार मनात सतत खंत करी. त्यानं आपलं दुःख आईकडे कधी व्यक्त केलं नाही. आईलाही त्याचं दुःख जाणवत होतं.

खेळात त्याला गती नव्हती कारण तो अशक्त होता. त्याला गाण्याची आवड होती पण अशक्तपणामुळे त्याला त्याचा गळा

साथ देत नव्हता. चित्रकलेची मात्र त्याला खूप आवड होती. तो नेहमी चित्रं काढण्यात वेळ घालवी. त्याची चित्रकलेची आवड पाहून तुषारची आई त्याच्या वडिलांना म्हणाली, 'आपल्या तुषारला चित्रकलेची खूप आवड आहे. आपण त्या बाबतीत त्याला मदत करायला हवी.'

तुषारच्या वडिलांना ते पटलं. त्यांनी त्याच्यासाठी चित्र-कलेचं सगळं साहित्य आणलं व त्याला मार्गदर्शन करायला चित्रकला शिक्षक दर शनिवारी येऊ लागले. तुषारला त्याचं आवडतं काम मिळाल्याने खूप आनंद झाला. तीन महिन्यात त्याची खूपच प्रगती झाली. निसर्गदृश्य काढण्यात त्याला अधिक रस होता.

शाळेच्या चित्रकला शिक्षकाने मुलांना 'नदी किनाऱ्या-वरील दृश्य' हे चित्र रेखाटायला सांगितलं. तुषारचं चित्र पाहून शिक्षक चकित झाले. त्यांनी सगळ्या वर्गातील मुलांना ते चित्र दाखवून विचारलं. ' आपण हे तुमच्या वर्गात लावू या का ? '

'हो सर.' मुलं ओरडली. त्यानंतर तुषार छान छान चित्रं काढून शाळेत शिक्षकांना दाखवायला नेई. त्याचा वर्ग त्याच्या चित्रांनी छान सजला. एक दिवस मुख्याध्यापिका तुषारच्या वर्गात लावलेली चित्रं पाहून प्रभावित झाल्या. मुलांनी ती चित्रं तुषारने काढली हे सांगितल्यावर त्यानी तुषारचं खूप कौतुक केलं.

काही दिवसांनी शाळेने शैक्षणिक साधनं व चित्रकला याचं प्रदर्शन भरवायचं ठरवलं. मुलं तयारी करू लागली. प्रत्येक विषयातील शैक्षणिक साहित्याची चित्र काढायची होती. त्यापैकी बरंचसं काम तुषारवर सोपवलं गेलं. शिवाय चित्रकलेची चित्रं